## कलम 4 (1) (ब) (III)
## सार्वजनिक प्राधिकरणात कोणताही निर्णय घेतांना पाहिली जाणारी निर्णय प्रक्रियेची आणि त्यावरिल देखरेखीची पध्दत आणि सोपविलेली व्यक्तिगत उत्तरदायित्व

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरदायित्व निश्चित करुन कार्यपध्दतीचे प्रकाशन कार्यालयाचे कामकाज सांभाळणारे कर्मचारी संबंधित विषयाची संचिका कनिष्ठ प्रशासन अधिकारी,सहाय्यक प्रशासन अधिकारी यांचेकडे सादर केली जाते.

संबंधित् कार्यासनाचे कर्मचारी, तालुका आरोग्य अधिकारी,वैद्दकीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडून माहिती व अहवाल प्राप्त करण्याची जबाबदारी आहे व या कामावर पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी अनुक्रमे कनिष्ठ प्रशासन अधिकारी,सहाय्यक प्रशासन अधिकारी यांची आहे. संबंधित कार्यासनांच्या कर्मचा-यांची त्यांचेकडे असलेल्या अभिलेखाचे अदयावतीकरण करुन ठेवण्याची जबाबदारी आहे.

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | कालावधी दिवस | कामासाठी जबाबदार अधिकारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1 | तालुका आरोग्य अधिकारी यांचेकडून विविध अहवाल प्राप्त करणे | 1 महिना | संबंधित कार्यासनांचे कर्मचारी | कनि.प्रशा.अधि./सहा.प्रशा.अधि. हे या कामाचे पर्यवेक्षण करतील |
| 2 | शासन व इतर विभाग,सर्वसामान्य नागरिकांकडून आलेले अर्ज,वैद्दकीय बीले इ. | 1 महिना | संबंधित कार्यासनांचे कर्मचारी | कनि.प्रशा.अधि./सहा.प्रशा.अधि. हे या कामाचे पर्यवेक्षण करतील |